। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २८४ वा । सोमवार दिनांक २६ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### मोटारसायकला धडकेत एकाचा मृत्यू

धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अशोक बब्रुवान जाधव, वय ३१ वर्षे, व सोबत मयत बब्रुवान तुकाराम जाधव, वय ५५ वर्षे, रा. सारोळा मांडवा ता. वाशी जि. धाराशिव हे दोघे दि.११.०१.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान कळंब ते सारोळा मांडवा जाणारे रोडवर गंभीरवाडीच्या पुढे गव्हाणे वस्तीजवळ अज्ञात वाहन चालकाने ताब्यातील वाहन हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून अशोक जाधव यांचे मोटरसायकलला समोरुन धडक दिली. या अपघातात बब्रुवान जाधव हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर अशोक जाधव हे किरकोळ जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी अशोक जाधव यांनी दि.२३.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१),२८१, १२५(ए),१२५(बी) सह १३४ (अ)(ब), १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शेतात कब्जा करुन शेतातील पिकांचे केले नुकसान केले

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, शंकर यशवंत कदम, शितल उर्फ नागुबाई शंकर कदम, महादु शंकर कदम, सर्व रा. तेर ता. जि. धाराशिव यांनी दि.११.०१.२०२६ रोजी फिर्यादी नामे- सखुबाई माणिक पेठे, वय ७६ वर्षे, रा. तेर ता. जि. धाराशिव यांचे शेत गट नं ११२० मध्ये सतत मागील गोष्टीचे कारण काढुन ट्रॅक्टर चालकाशी संगणमत करुन फिर्यादीचे शेतात कब्जा करुन शेतातील पिकांचे ३ ते ३.५लाख रुपयाचे नुकसान केले. व फिर्यादीस शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सखुबाई पेठे यांनी दि.२३.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो. ठाणे येथे ३२९,३२४, ३५२, ३५१ (२), ३(५) भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शासकीय कामात अडथळा करणाऱ्यावर गुन्हा दाखल.

कळंब पोलीस ठाणे :फिर्यादी निखली शरद आडसुळ, वय ४५ वर्षे, व्यवसाय-चालक कळंब आगार रा. ईटकर ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२२.०१.२०२६ रोजी २२.०० वा. सु. पुणे एस. टी. बस घेवून जात असताना अभिजीत बाळासाहेब मडके, ज्ञानेश्वर उर्फ माउली मडके, सचिन देडे व इतर एक इसम यांनी वडीलांचे हाफ तिकीट काढण्यासाठी ओरिजनल आधाकार्ड दाखवण्याच्या कारणावरुन शासकीय कामात अडथळा आणुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन तुम्ही जर या रोडवर ड्युटीला आलातर बघुन घेण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी निखील आडसुळ यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे कळंब येथे गुन्हा नोंदवला आहे.

## तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले दर्शन



नांदेड (जिमाका) -: तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दर्शन घेतले. त्यांच्यासह आंध्रप्रदेश उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य चरणदीप सिंघ आदींनीही दर्शन घेतले. गुरुद्वारा बोर्डाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी, मान्यवर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मुरूम पालिकेच्या विषय समिती सभापती निवडी बिनविरोध



मुरूम(प्रतिनिधी)- येथीलपालिकेच्या स्थायी,पाणीपुरवठा,बांधकाम, महिला बालकल्याण, नियोजन व विकास,स्वच्छता व आरोग्य समिती सभापती निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडली.

मुरूम पालिकेतील विषय समित्यांच्या सभापती निवडीसाठी शनिवारी (दि २४) पालिका सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली होती.पीठासीन अधिकारी म्हणून नळदुर्ग पालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार हे होते.यावेळी परंपरेनुसार स्थायी समितीच्या सभापतीपदी नगराध्यक्ष बापुराव पाटील यांची तर पाणीपुरवठा सभापतीपदी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.याबरोबरच सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी सिद्धरय्या ख्याडे,स्वच्छता व आरोग्य समितीच्या सभापतीपदी राजेंद्र बेंडकाळे,नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी रुपचंद गायकवाड यांची तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सौ ज्योती शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली.निवडीनंतर नवनिर्वाचित सभापती व सदस्यांचा पालिका प्रशासनाकडून सत्कार करण्यात आला.यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांच्यासह गटनेते गणेश अंबर,नगरसेवक गौस शेख,सचिन फनेपुरे,अहमद मणियार,नगरसेविका महादेवी बनसोडे,अंकिता अंबुसे,समीना मुल्ला,स्नेहा बंडगर आदींसह भाजपचे सर्व नगरसेवक, नगरसेविका,पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पालिकेचे सर्व विभागाचे प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

## धाराशिव येथे सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा



धाराशिव,दि.२३ जानेवारी (जिमाका) आज २३ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.या दिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस छत्रपती शिवाजी हायस्कूल,धाराशिव येथे उत्साहात साजरा करण्यात आला.हा कार्यक्रम जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेताजी सुभाषचंद्र बोस,वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त तसेच शेतकरी नेते उद्धवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले व उपस्थितांनी मतदार म्हणून सामूहिक शपथ घेतली.या कार्यक्रमासाठी मतदार जनजागरण समिती,धाराशिव यांना आमंत्रित करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

मतदार दिनानिमित्त प्रा.रवि सुरवसे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की,तुम्ही उद्याचे मतदार आहात. चित्रपटातील हिरो पैसे कमावतात; मात्र देशासाठी संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे महापुरुष हे खरे सुपरहिरो आहेत.त्यांच्या जीवनकार्याचे वाचन व विचार आत्मसात केल्यास जीवनात यशस्वी होता येते.त्यांनी अतिशय सोप्या भाषेत संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

प्रस्तावनेत शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे यांनी राष्ट्रीय मतदार दिवस व भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे महत्त्व स्पष्ट केले.मतदार हा राज्यघटनेने दिलेला मौलिक अधिकार असून एका मताची किंमत अनमोल असल्याचे त्यांनी नमूद केले. संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या हक्कांचा योग्य वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात गट शिक्षणाधिकारी असरार पठाण यांनी विद्यार्थ्यांना मतदार दिनाचे महत्त्व पटवून देत लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व विशद केले.यानंतर मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.गट शिक्षणाधिकारी असरार पठाण व एम.डी.देशमुख यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली.

## नळदुर्ग नगरपालिकेतील विषय समिती सभापतींची निवड बिनविरोध



नळदुर्ग(प्रतिनिधी)- नळदुर्ग नगरपालिकेतील स्थायी समिती तसेच विविध विषय समितींच्या सभापती पदांच्या निवडी बिनविरोध पार पडल्या. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या विशेष सभेत एकूण सहा विषय समिती सभापतींची निवड करण्यात आली असून, यामध्ये भाजप-शिंदे सेना महायुतीच्या चार तर काँग्रेस पक्षाच्या दोन नगरसेवकांची सभापतीपदी निवड करण्यात आली आहे.या निवड प्रक्रियेत स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांची निवड झाली. तर नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार यांची निवड करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी शशिकांत पुदाले, पाणीपुरवठा व जलनिसारण समितीच्या सभापतीपदी तानाजी जाधव, स्वच्छता, आरोग्य व दिवाबत्ती समितीच्या सभापतीपदी सुमन ठाकूर, महिला व बालविकास समितीच्या सभापतीपदी अर्पणा बेडगे, तर शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी इमाम शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सर्व समित्यांच्या सभापती व सदस्यांची निवड एकमताने पार पडली. निवडीनंतर नूतन सभापती व समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून वाशी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी सुरेखा कांबळे, नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर उपस्थित होते.

यावेळी सत्ताधारी भाजप-शिंदे सेना महायुती तसेच विरोधी पक्ष काँग्रेसचे नगरसेवक, नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## गावठी दारु अवैध पोलिसांनी पकडली

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतगत मोसिन रा.वाठवडा ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२३.०१.२०२६ रोजी ११.१० वा. सु. वडगाव ते वाठवडा जाणारे रोडच्या उजव्या बाजूस हॉटेल आलिजा च्या मागे अंदाजे ३,२५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५ सिलबंद बाटल्या व ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर खुद्रुस रा.रांजणी ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२३.०१.२०२६ रोजी १४.०० वा. सु. साई नॅचरल शुगर कारखान्या रांजणी च्या पाठीमागील बाजूस अंदाजे ३,२८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या व ३५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

लातूर समाचार

## भारतीय प्रजासत्ताक दिन

दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जातो. हा केवळ एक राष्ट्रीय सण नसून तो भारतीय लोकशाहीच्या विजयाचा आणि संविधानाच्या सार्वभौमत्वाचा उत्सव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने लिहिलेले संविधान २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अमलात आले आणि आपला भारत देश एक 'प्रजासत्ताक राष्ट्र' बनला. स्वातंत्र्यानंतर भारताने केवळ राजकीय गुलामगिरीतून मुक्ती मिळवली नाही, तर स्वतःचे शासन स्वतःच्या संविधानाच्या आधारे चालवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. नागरिक सर्वोच्च आणि कायदा सर्वोपरि ठरवणाऱ्या या व्यवस्थेची सुरुवात २६ जानेवारी रोजी झाली. म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजवंदनाचा सोहळा नसून तो भारतीय लोकशाहीच्या मूल्यांचा, संविधानिक अधिकारांचा आणि राष्ट्रीय एकतेच्या संकल्पाचा गौरव करणारा पवित्र दिवस आहे. बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो, हे स्वप्न उराशी बाळगून कोट्यवधी भारतीयांच्या अस्मितेचा सोहळा म्हणजे 'प्रजासत्ताक दिन'. दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जातो. हा केवळ एक राष्ट्रीय सण नसून तो आपल्या लोकशाही मूल्यांचा, संविधानिक व्यवस्थेचा आणि नागरिकांच्या अधिकार-कर्तव्यांचा भव्य उत्सव आहे. दरवर्षी २६ जानेवारी रोजी संपूर्ण देशात हा दिवस अत्यंत अभिमानाने साजरा केला जातो. या दिवशी भारताने स्वतःला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खरी दिशा मिळाली ती संविधानामुळे, आणि त्या संविधानाच्या अंमलबजावणीचा ऐतिहासिक क्षण म्हणजे प्रजासत्ताक दिन होय. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, मात्र त्या वेळी देशाकडे स्वतःचे संपूर्ण संविधान नव्हते. पुढील काही वर्षे भारताने ब्रिटिश काळातील कायद्यांवरच कारभार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेने अथक परिश्रमातून भारतीय संविधान तयार केले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० पासून ते देशभर लागू झाले. याच दिवसाच्या स्मरणार्थ २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून निवडण्यात आला. भारतीय संविधान हे जगातील सर्वात विस्तृत आणि सविस्तर लिखित संविधान मानले जाते. या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचे अधिकार दिले. धर्म, जात, भाषा, लिंग किंवा प्रदेश यावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान हक्क मिळावेत, हा संविधानाचा मुख्य उद्देश आहे. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांच्या माध्यमातून संविधान नागरिक आणि राज्य यांच्यातील नाते अधिक मजबूत करते. प्रजासत्ताक दिनाचे मुख्य आकर्षण म्हणजे राजधानी दिल्लीतील राजपथावर होणारी भव्य परेड. राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात येतो आणि तिन्ही सैन्य दलांची ताकद, शिस्त आणि शौर्य या परेडमधून सादर होते. विविध राज्यांची सांस्कृतिक झलक दाखवणाऱ्या चित्ररथांमुळे भारताची विविधतेतील एकता अधोरेखित होते. देशभरातील शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहण, देशभक्तीपर कार्यक्रम आणि भाषणे आयोजित केली जातात. प्रजासत्ताक दिन आपल्याला केवळ अधिकारांची आठवण करून देत नाही, तर आपल्या कर्तव्यांची जाणीवही करून देतो. मतदानाचा हक्क वापरणे, कायद्याचे पालन करणे, राष्ट्रीय एकात्मता जपणे आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशील राहणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लोकशाही मजबूत राहण्यासाठी जागरूक, सुजाण आणि जबाबदार नागरिक असणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचे भवितव्य युवकांच्या हातात आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने युवकांनी संविधानाची मूल्ये आत्मसात करणे, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेणे गरजेचे आहे. भ्रष्टाचारमुक्त, समताधिष्ठित आणि प्रगत भारत उभारण्यासाठी युवकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रजासत्ताक दिन आपल्याला स्वातंत्र्य केवळ मिळवण्यापुरते मर्यादित नसून ते जपण्याची जबाबदारीही आपलीच आहे, हे शिकवतो. संविधानाचे पालन, लोकशाही मूल्यांचा सन्मान आणि राष्ट्रीय एकतेचे रक्षण हेच या दिवसाचे खरे सार आहे. प्रजासत्ताक दिन हा भारताच्या आत्मसन्मानाचा आणि लोकशाही बळकटीचा प्रतीक आहे. हा दिवस आपल्याला संविधानाच्या आदर्शांनुसार जगण्याची प्रेरणा देतो. सत्यमेव जयते या तत्त्वावर चालत, न्याय, समानता आणि बंधुतेची मूल्ये जोपासत पुढे जाणे, हाच प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ आहे. भारतीयांची जबाबदारी लोकशाहीत मोठी आहे. भारताची सर्व मालमत्ता ही नागरिकांची आहे या राष्ट्रीय मालमत्तेचे संरक्षण करणे ही लोकशाहीत नागरिकांची जबाबदारी आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत प्रजसत्ताकमध्ये राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान होवू नये याची खबरदारी घेतली पाहिजे. प्रजासत्तकाचा साधा अर्थ हा प्रजेची सत्ता म्हणजे आपली सत्ता आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यानुसार वागले पााहिजे. लोकशाही कशी बळकट होईल याचा विचार केला पाहिजे. त्यामुळे भारतीय लोकशाही तशी जगात बळकट आहे. भारतीय नागरिक लोकशाहीत वावरताना सर्व प्रकारचे भान ठेवत आहेत. भारतीय घटना ही जगात श्रेष्ठ समजली जाते. अनेक देशाची घटनेचा अभ्यास करून लिहीली आहे. अनेत तज्ज्ञ मंडळींचा सहभाग होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे उपकार आहेत, त्यांचे योगदान आहे. घटनकार म्हणून त्यांचा आदर सर्वजनच करतोत. त्यामुळे प्रजासत्ताक दिन भारतीयांचा आनंदाचा क्षण आहे. सर्वजन हा राष्ट्रीय सण साजरा आनंदाने करातात यापेक्षा भारताचे भाग्य काय असू शकेल. सर्वांना भारतीय प्रजासत्तकाच्या हार्दिक शुभेच्छा!

# 'पुणे ग्रँड टूर'ने जिल्ह्याचा पर्यटन नकाशा जागतिक!!




दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय पर्यटन दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यटनाच्या माध्यमातून देशाचा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारसा जपणे, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि जागतिक स्तरावर भारताची ओळख अधिक भक्कम करणे, हा यामागचा मूलभूत उद्देश आहे. पर्यटन म्हणजे केवळ प्रवास नव्हे; तो संस्कृतीचा संवाद आहे, इतिहासाची ओळख आहे, निसर्गाशी नातं आहे आणि माणसांमधील संवेदनशील संबंधांचा सेतू आहे.

यावर्षी पुण्याच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत खास, अभिमानास्पद आणि ऐतिहासिक ठरणार आहे. कारण २३ जानेवारी रोजी जिल्हा प्रशासनाच्या अभूतपूर्व नियोजनाने यशस्वीरीत्या पार पडलेल्या 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेने पुणे जिल्ह्याच्या पर्यटन क्षेत्राला केवळ नवी दिशा दिली नाही, तर त्याला थेट जागतिक व्यासपीठावर नेण्याची ठोस पायाभरणी केली आहे. ही स्पर्धा क्रीडाक्षेत्रापुरती मर्यादित न राहता पुण्याच्या इतिहास, संस्कृती, निसर्ग, शेती, ग्रामीण जीवनशैली आणि आधुनिक पायाभूत सुविधांचा एक भव्य जागतिक 'शोकेस' ठरणार आहे.

आजवर पुणे हे शिक्षणाचे माहेरघर, आयटी हब, सांस्कृतिक राजधानी आणि औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जात होते. मात्र 'पुणे ग्रँड टूर' नंतर पुण्याची ओळख एका 'ग्लोबल टुरिझम डेस्टिनेशन' म्हणून ठामपणे आकार घेणार आहे. ही केवळ प्रतिमाबदलाची प्रक्रिया नसून, संपूर्ण पर्यटन अर्थव्यवस्थेच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे.

पुणे जिल्ह्याचा इतिहास हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण जगाच्या अभ्यासाचा विषय राहिला आहे. स्वराज्य उभारणीची गाथा, छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय दूरदृष्टीत्व, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान, मावळ्यांचे पराक्रम, किल्ल्यांवरील संघर्ष आणि गनिमी काव्याची रणनितीष्ठहे सारे इतिहासाचे अध्याय जागतिक पातळीवर अभ्यासले जातात. 'ग्रँड टूर'च्या निमित्ताने हा इतिहास पुस्तकांपुरता न राहता प्रत्यक्ष भूप्रदेशावर अनुभवता येईल, अशा स्वरूपात जागतिक प्रेक्षकांसमोर पोहोचणार आहे.

पुरंदरचा वारसा हे याचे प्रभावी उदाहरण ठरणार आहे. पुरंदर म्हणजे केवळ एक किल्ला नव्हे, तर स्वराज्याच्या इतिहासाचा जिवंत दस्तऐवज आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला हा परिसर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक निर्णायक घटनांचा साक्षीदार आहे. 'पुणे ग्रँड टूर'च्या मार्गामुळे हा भाग आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये, थेट प्रक्षेपणात आणि जागतिक पर्यटकांच्या नकाशावर ठळकपणे अधोरेखित होणार आहे. परिणामी, पुरंदर हे केवळ इतिहासप्रेमींचेच नव्हे, तर जागतिक पर्यटकांचेही महत्त्वाचे आकर्षण केंद्र बनेल.

भोर-वेल्हे परिसरातील राजगडष्ठ स्वराज्याची पहिली राजधानीष्ठ इतिहासात अढळ स्थान असलेला किल्ला आहे. जिथून स्वराज्याचे स्वप्न विस्तारले, जिथून प्रशासन, राजकारण आणि लष्करी धोरणांची सूत्रे हलली, तो राजगड आता जागतिक पर्यटनाच्या केंद्रस्थानी येणार आहे. राजगडाभोवतीचा सह्याद्रीचा निसर्ग, धुक्याची दुलई, घाटवाटा, धबधबे, डोंगररांगा आणि ऐतिहासिक पायवाटाष्ठ या साऱ्यांचा अनुभव 'ग्रँड टूर'च्या निमित्ताने जगासमोर एकसंध स्वरूपात उभा राहणार आहे.

पुणे जिल्ह्याला निसर्गाने भरभरून दिले आहे. पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांग, हिरव्या दऱ्या, घनदाट जंगलं, नद्या, धरणांचे जलाशय आणि शेतीप्रधान परिसरया सगळ्यामुळे पुण्याला अद्वितीय भौगोलिक वैशिष्ट्य लाभले आहे. पानशेत, वरसगाव, टेमघर, नीरा-देवघर, खडकवासला यांसारख्या धरणांचे विस्तीर्ण जलसाठे आणि त्यांच्या काठाने गेलेले सायकलिंग मार्ग पर्यटकांसाठी केवळ प्रवास न राहता एक दृश्यात्मक व भावनिक अनुभव घडवणार आहेत. निळ्या पाण्यावर उमटणारी सह्याद्रीची सावली, धरणकाठचा शांत परिसर आणि ग्रामीण जीवनशैलीचा साधेपणा पर्यटनाला नवा अर्थ देणार आहे.

याचबरोबर कृषी पर्यटन हा एक महत्त्वाचा आयाम पुढे येणार आहे. पुरंदरमधील जगप्रसिद्ध अंजीर आणि सीताफळे आता केवळ बाजारपेठेपुरती मर्यादित न राहता पर्यटनाची ओळख बनणार आहेत. विदेशी पर्यटक थेट शेतावर जाऊन फळांची तोड, स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद, ग्रामीण जेवणाचा अनुभव आणि मातीचा गंध अनुभवू शकतील, अशी पोषक परिसंस्था उभी राहणार आहे. पर्यटन आता शहरकेंद्रित न राहता थेट शेतापर्यंत पोहोचणार आहेष्ठ हीच या बदलाची खरी ताकद आहे.

पर्यटनाचा कणा म्हणजे पायाभूत सुविधा 'पुणे ग्रँड टूर'मुळे ही बाब केवळ चर्चेपुरती न राहता प्रत्यक्षात साकार होणार आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील रस्त्यांचा दर्जा सुधारेल, कनेक्टिव्हिटी वाढेल. ऐतिहासिक किल्ले, धरणे, घाटवाटा, कृषी पर्यटन केंद्रे आणि निसर्गस्थळे अधिक सुलभपणे पोहोचण्याजोगी बनतील. ही भौतिक पायाभूत सुविधा म्हणजेच पर्यटन विकासाचा मजबूत पाया ठरेल. याचा सर्वाधिक सामाजिक-आर्थिक परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दिसून येणार आहे. होमस्टे संस्कृती, स्थानिक मार्गदर्शक, हस्तकला, स्थानिक खाद्यसंस्कृती, शेतीपूरक व्यवसाय, महिलांचे स्वयंसहायता गट आणि युवकांचे स्टार्टअप्सष्ठ या सगळ्यांना नव्या संधी उपलब्ध होतील. एअर बीएनबीसारख्या प्लॅटफॉर्ममुळे अनेक नागरिकांना नवा व्यवसाय उभारण्याचे पाठबळ मिळेल. पर्यटन म्हणजे केवळ बाहेरून येणारा पैसा नाही, तर स्थानिक समाजरचनेला आत्मनिर्भर करणारे विकास मॉडेल ठरेल.

आजच्या राष्ट्रीय पर्यटन दिनी हे स्पष्टपणे जाणवते की पुणे जिल्हा आता केवळ शिक्षण, उद्योग किंवा आयटीपुरता मर्यादित राहणार नाही. इतिहास, निसर्ग, शेती, संस्कृती, आधुनिकता आणि जागतिक पर्यटन यांचा संगम असलेले एक समग्र केंद्र म्हणून पुणे उभे राहणार आहे. 'पुणे ग्रँड टूर' ही केवळ एक स्पर्धा नव्हती; ती पुण्याच्या पर्यटन विकासाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहे.

या स्पर्धेने रोवलेली मुहूर्तमेढ आगामी काळात पुण्याच्या पर्यटनाला नव्या सुवर्णकाळात घेऊन जाणार आहे. पुणे जिल्हा आता केवळ भारताचा पर्यटन नकाशा बदलणार नाही, तर जागतिक पर्यटन नकाशावर स्वत:ची स्वतंत्र व ठळक ओळख निर्माण करणार आहे. हे चित्र अत्यंत आश्वासक आहे. पुणेकरांनी ही संधी मनावर घेतली आहे, हे विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळे विकेंड पर्यटनाची मर्यादा दूर होऊन वर्षभर चालणारे पर्यटन सिझन निर्माण होणार आहे. आपण या पर्यटन उत्क्रांतीचे साक्षीदार आहोतष्ठ ही भावना मनाला प्रचंड आनंद देणारी आहे. भविष्यात ही गोष्ट आपण अत्यंत अभिमानाने मिरवत राहू, हे निश्चितष्ठ!!

**- युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

# सकाळी अंथरुणातून उठताच सतत शिंका येतात ?

बहुतांश लोकांना सकाळी उठल्याबरोबर सतत शिंका येऊ लागतात. याला वैद्यकीय शास्त्रात ॲलर्जिक राइनाइटिस म्हणतात. कधीकधी हवामानात अचानक बदल, थंड वातावरण, धुळीचा संपर्क, कोणताही रंग किंवा स्प्रे आणि प्रदूषण यामुळे ॲलर्जिक राइनाइटिसची समस्या उद्भवू शकते.

श्वास घेताना हवेतील धुळीचे कण शरीरात प्रवेश करतात आणि शरीरात अशी प्रतिक्रिया होते. यामुळे शिंका येतात. हवामानात अचानक बदल झाल्यामुळे लोकांना अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते. आज आपण या समस्येसाठी काही आयुर्वेदिक उपाय जाणून घेऊया..

**तमालपत्राचा चहा–**

तमालपत्राचा चहा हे एक अतिशय फायदेशीर ड्रिंक आहे. त्याचे शरीरासाठी अनेक फायदे आहेत. अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्मांनी समृद्ध असलेले तमालपत्र जळजळ आणि सूज कमी करण्यास मदत करते. अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले दालचिनी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि शरीराला अनेक समस्यांपासून वाचवण्यास मदत करते. त्यामुळे शिंकासुद्धा कमी होतात.

**लवंग चहा–**

लवंगाचा चहा वारंवार शिंका येणे यासारख्या ॲलर्जीक राहिनाइटिसची लक्षणे कमी करू शकते. लवंग चहामध्ये



अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे प्रथम ॲलर्जीनचे परिणाम कमी करतात आणि नंतर रोगप्रतिकारक शक्तीला त्यांच्याशी लढण्यास मदत करतात. लवंग चहा अँटीहिस्टामाइन म्हणून देखील कार्य करते आणि ॲलर्जी शांत करते.

**अश्वगंधाचा चहा–**

अश्वगंधाच्या चहामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म भरपूर असतात. जे ॲलर्जीक राहिनाइटिसची लक्षणे कमी करू शकतात. ते घसा खवखवणे, डोकेदुखी, नाकातून पाणी वाहणे आणि सायनस कंजेशनमध्ये देखील मदत करते. त्यात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म देखील आहेत जे शरीराला अनेक रोगांपासून वाचवतात.

**पुदिन्याचा चहा–**

पुदिन्याच्या चहामध्ये अँटीव्हायरल गुणधर्म असल्याचे आपण नेहमीच ऐकलं आहे. ते ॲलर्जीक राहिनाइटिसची लक्षणे लवकर कमी करू शकते. नियमित सेवनाने हंगामी संसर्ग, डोकेदुखी आणि सर्दी यासारख्या अनेक समस्या टाळण्यास देखील मदत होऊ शकते.

## किडनीमधील घाण काढून टाकून मजबूत बनवतात 'या' ४ भाज्या, सुरु करा सेवन



किडनी शरीराच्या सर्वात आवश्यक अवयवांपैकी एक आहे. किडनीमध्ये नेफ्रॉन नावाचे छोटे फिल्टर असतात. जे रक्त स्वच्छ करतात. जेव्हा हे फिल्टर खराब होतात तेव्हा शरीरातून विषारी पदार्थ योग्यरित्या काढून टाकता येत नाहीत आणि त्यामुळे ते रक्तात जमा होऊ लागतात. यामुळे फॉस्फरस, पोटॅशियम आणि सोडियम सारख्या आवश्यक घटकांचे संतुलन बिघडते. ज्यामुळे किडनीचे आजार होतात.

परंतु तज्ज्ञांच्या मते किडनी निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही काही भाज्या खाऊ शकता. भाज्या शरीरासाठी, विशेषतः किडनीच्या रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तुमच्या दैनंदिन आहारात भाज्यांचा समावेश केल्याने फक्त चवच वाढत नाही तर आवश्यक खनिजे, फायबर आणि इतर अनेक पोषक घटक देखील मिळतात. फायबर बद्धकोष्ठता रोखते, पचन सुधारते आणि शरीर आतून स्वच्छ ठेवते.चला जाणून घेऊया कोणत्या भाज्या किडनी निरोगी ठेवण्यास मदत करतात..

**मुळा**

मुळा ही कमी पोटॅशियम असलेली भाजी आहे आणि ती सॅलडमध्ये समाविष्ट केली जाऊ शकते. मुळा व्हिटॅमिन सीचा देखील एक चांगला स्रोत आहे. नियमित मुळ्याचे सेवन केल्याने किडनीतील विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होईल.

**फ्लॉवर–**

फ्लॉवरसुद्धा कमी पोटॅशियम असलेली भाजी आहे. ज्यामुळे ती किडनीच्या आरोग्यासाठी एक चांगला पर्याय बनते. फ्लॉवर फायबर आणि व्हिटॅमिन सीचा देखील एक चांगला स्रोत आहे. फ्लॉवरमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असलेले फायटोकेमिकल्स असतात. ही एक कमी पोटॅशियम असलेली भाजी असल्याने किडनीच्या आरोग्यासाठी आहारात समाविष्ट केली जाऊ शकते.


**लाल ढोबळी मिरची–**

लाल शिमला मिरची किंवा ढोबळी मिरचीमध्ये पोटॅशियम कमी असते. आणि त्यात भरपूर व्हिटॅमिन ए आणि सी असते. जे दोन्ही किडनीच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

**कोबी–**

कोबी ही एक अशी भाजी आहे जी किडनीच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. त्यात पोटॅशियम आणि फॉस्फरस सारख्या खनिजांचे प्रमाण कमी असते.जे बहुतेकदा किडनीच्या रुग्णांसाठी चिंतेचा विषय असतात. त्यात व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन बी६ भरपूर प्रमाणात असते. कोबीमध्ये फायबरचे प्रमाण देखील चांगले असते, जे पचन सुधारते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते.

## मुलांची एकाग्रता कशी वाढवायची? फॉलो करा 'या' सोप्या टिप्स



प्रत्येक लहान मुलांसाठी काहीही करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे एकाग्रता असते. प्रौढ लोक हे साध्य करण्यासाठी ध्यान आणि योग यासारख्या विविध गोष्टींचा वापर केला जातो. परंतु मुलांसाठी योगाभ्यास करणे थोडे आव्हानात्मक असू शकते. परंतु लहानपणापासूनच तुमच्या मुलाला एकाग्र करायला शिकवणे हे आयुष्यभर फायदेशीर ठरू शकते.

मुलांना ध्यान करायला लावणे किंवा कंटाळवाण्या आणि वेळखाऊ कामामध्ये सहभागी करून घेणे कठीण आहे. त्यामुळेच मुलांना मनोरंजक गोष्टींमध्ये सहभागी करून तुम्ही तुमच्या मुलाची एकाग्रता वाढवू शकता. आज आपण लहान मुलांची एकाग्रता सुधारण्यासाठी काही सोप्या-सोप्या टिप्स जाणून घेऊया..

**कामे विभाजित करा**

कधीकधी मुलांना मोठे काम पूर्ण करण्यात अडचण येते. म्हणून, मोठे काम लहान लहान तुकड्यांमध्ये विभाजित करा. जेणेकरून तुमच्या मुलाचे मन भटकणार नाही आणि ते पूर्ण करण्यासाठी त्यांना जास्त दबाव जाणवणार नाही. तुम्ही हे काम दोन भागात विभागून करू शकता.

**ध्येय निश्चित करा–**

मुलांसाठी एक ध्येय निश्चित करा आणि नंतर त्यांना ते पूर्ण करण्यास सांगा. जर त्यांनी ते पूर्ण केले तर त्यांना यशाची भावना देण्यासाठी त्यांना बक्षीस द्या. त्यांचा वेळ फक्त एकाच गोष्टीवर केंद्रित करू नका. त्यांना वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करा. यामुळे त्यांची एकाग्रता वाढण्यास मदत होईल.

**मुलांचे निरीक्षण करा–**

यासाठी मुलापासून स्वतःला वेगळे ठेऊन, ते पुस्तक वाचत असताना किंवा खेळत असताना त्यांचे निरीक्षण करा. त्यांच्या अभिव्यक्तींकडे आणि ते गोष्टींबद्दल कसे विचार करतात यावर बारकाईने लक्ष द्या. नंतर, त्यांच्या आवडी समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यांना ज्या गोष्टींमध्ये रस आहे त्यावर ते लक्ष केंद्रित करू शकतील.

**स्क्रीन टाइम ठरवा–**

मुले अनेकदा त्यांचा अभ्यास विसरून जातात आणि गेम खेळत किंवा फोन वापरत तासन्तास घालवतात. यामुळे त्यांचे लक्ष विचलित होऊ शकते आणि त्यांच्या मेंदूवर परिणाम होऊ शकतो. हे टाळण्यासाठी, त्यांचा स्क्रीन टाइम हळूहळू कमी करा आणि त्यांना जुन्या काळातील, मेंदूला चालना देणारे खेळ खेळण्यास प्रोत्साहित करा.

# प्रजासत्ताक दिन : केवळ सोहळा नव्हे, तर जबाबदारीची आठवण



२६ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासात केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही. तो दिवस आहे भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा, संविधानाच्या सर्वोच्चतेचा आणि नागरिकांच्या सार्वभौमत्वाचा. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले आणि हजारो वर्षांच्या विषमतेच्या, अन्यायाच्या आणि गुलामगिरीच्या इतिहासाला वैचारिक छेद दिला. त्यामुळे प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजारोहण, संचलन किंवा भाषणांचा सोहळा नसून, तो स्वतःला प्रश्न विचारण्याचा, आत्मपरीक्षणाचा आणि संविधानाशी नवी बांधिलकी जाहीर करण्याचा दिवस आहे. आज अमृतमहोत्सवोत्तर भारतात प्रजासत्ताक दिन साजरा करताना एक मूलभूत प्रश्न सतत डोकावतो की, आपण खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक आहोत का? प्रजासत्ताक म्हणजे सत्ता राजाच्या, धर्माच्या किंवा एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हातात नसून संपूर्ण जनतेच्या हातात असणे. भारतीय राज्यघटनेने थश, िंहश झशेश्रिश ेष खपवळर या शब्दांनी सुरुवात करून ही भूमिका स्पष्ट केली. भारतात राजा नाही, धर्माधारित राज्य नाही; आहे ते फक्त संविधानाधिष्ठित लोकशाही राज्य. मात्र केवळ घटना स्वीकारल्याने प्रजासत्ताक साकारत नाही. ते जिवंत राहते ते न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार स्तंभांवर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट इशारा दिला होता की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावी लागेल. अन्यथा संविधान कागदावर राहील, वास्तवात नाही. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. पण त्याचे महत्त्व त्याच्या जाडीमुळे नाही, तर त्यात सामावलेल्या मानवी मूल्यांमुळे आहे. संविधानाने देशातील शेवटच्या माणसालाही हक्क दिले; आवाज नसलेल्यांना आवाज दिला; आणि सत्ता सत्ताधाऱ्यांच्या हातून काढून जनतेकडे दिली. मात्र आजच्या काळात संविधानाचा उल्लेख अनेकदा औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. संविधानावर प्रेम दाखवले जाते, पण त्याची आत्मा समजून घेण्याची तयारी कमी दिसते. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी संविधानाची शपथ घेतली जाते; पण वर्षभरात त्या शपथेचा विसर पडतो. प्रजासत्ताक दिनी भव्य संचलन होते, शौर्य, शिस्त आणि विविधतेचे दर्शन घडते. भारताची लष्करी ताकद, सांस्कृतिक वैविध्य आणि वैज्ञानिक प्रगती याचे चित्रण केले जाते. हे सारे अभिमानास्पद आहे. पण त्याचवेळी, देशातील शेतकरी कर्जबाजारी आहेत, तरुण बेरोजगार आहेत, स्त्रिया असुरक्षित आहेत, दलित–आदिवासी अजूनही अन्याय सहन करत आहेत, आणि संविधानाने दिलेले मूलभूत हक्क अनेकदा कागदावरच राहतात. या विरोधाभासांवर प्रजासत्ताक दिनीही मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. कारण साजरीकरण आणि सत्य यामध्ये वाढत जाणारी दरी लोकशाहीसाठी धोक्याची ठरते. आज नागरिक म्हणून आपण हक्कांबाबत जागरूक झालो आहोत, ही सकारात्मक बाब आहे. मात्र त्याच वेळी संविधानातील कर्तव्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, विविधतेचा आदर करणे, ही सगळी लोकशाहीची मूलभूत पायाभरणी आहे. प्रजासत्ताक म्हणजे सरकारवर टीका करण्याचा अधिकार; पण तो अधिकार जबाबदारीने वापरण्याची नैतिकताही तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा स्वातंत्र्य अराजकतेत बदलण्याची भीती असते. प्रजासत्ताक दिनाच्या ७५ वर्षांनंतरही जातीभेद, आर्थिक विषमता आणि लैंगिक अन्याय संपलेले नाहीत. संविधानाने समतेची हमी दिली, पण समाजमन अजूनही पूर्णपणे बदललेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत सांगितले होते की, भारतात भक्तीची भावना राजकारणात आली, तर लोकशाही धोक्यात येईल. आज व्यक्तीपूजा, अंधनिष्ठा आणि द्वेषाचे राजकारण वाढताना दिसत असेल, तर तो प्रजासत्ताक मूल्यांसाठी गंभीर इशारा आहे. भारताचे प्रजासत्ताक हे धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ धर्मविरोधी नव्हे, तर सर्व धर्मांना समान वागणूक देणारे राज्य. पण अलीकडच्या काळात धर्माच्या नावावर समाजात ध्रुवीकरण वाढत असल्याचे चित्र आहे. प्रजासत्ताक दिन हा धर्म, जात, भाषा यांपलीकडे जाऊन भारतीय नागरिक म्हणून आपली ओळख पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस असायला हवा. अन्यथा प्रजासत्ताकाची संकल्पना हळूहळू कोसळण्याचा धोका नाकारता येत नाही. भारताची लोकसंख्या तरुण आहे. ही तरुणाई प्रजासत्ताकाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र ती केवळ घोषणांमध्ये गुंतून न राहता, प्रश्न विचारणारी, चिकित्सक आणि जबाबदार बनली तरच लोकशाही मजबूत होईल. संविधान समजून घेणारी तरुण पिढीच प्रजासत्ताकाचे भवितव्य सुरक्षित ठेवू शकते. केवळ सोशल मीडियावरील देशभक्ती पुरेशी नाही; लोकशाहीचे भान आणि विवेक अधिक गरजेचा आहे. प्रजासत्ताक दिन हा वर्षातून एकदा साजरा करण्याचा कार्यक्रम नाही. तो दररोज जगायचा मूल्यांचा उत्सव आहे. संविधानाचे पालन, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांचा आवाज बनणे, हीच खरी प्रजासत्ताक दिनाची भावना आहे. आज गरज आहे ती ध्वजाला सलाम करताना संविधानालाही मनापासून स्वीकारण्याची. संचलन पाहताना समाजातील शेवटच्या माणसाची अवस्था लक्षात ठेवण्याची आणि अभिमानाबरोबर आत्मपरीक्षण करण्याची. कारण भारत प्रजासत्ताक आहे, फक्त घटनात्मकदृष्ट्या नव्हे, तर मूल्यात्मकदृष्ट्याही आणि ही जबाबदारी आपली सगळ्यांची आहे.

या प्रजासत्ताक दिनी आपण केवळ ध्वजाला वंदन न करता संविधानाच्या मूल्यांनाही मनापासून स्वीकारू या. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चार तत्त्वे फक्त शब्दांत नव्हे, तर आपल्या आचरणात, विचारात आणि निर्णयांत उतरवू या. प्रत्येक नागरिक जागरूक असेल, प्रत्येक आवाजाला सन्मान मिळेल आणि संविधान सर्वोच्च राहील, असाच समताधिष्ठित, विवेकी आणि मजबूत भारत घडवण्याचा संकल्प करू या. सर्वांना ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली



२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब–श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या–गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथ–ावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेग–ारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी –जहा–लवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळव–ादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये



व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवा–हरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर–दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी ला–गेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही. आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल–अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भार–ताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम – सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल–अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजग–ारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिज–ोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता. प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

**लेखक**
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )



## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जी–वनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जवाबदार




**५ खाद्य पदार्थांबद्दल: (क्रमशः)**

## २ Joke विनोद




ङ्गइत्यादी, इत्यादी... हा शब्द कोण जास्त वापरते?फ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना विच–ारले.
ङ्गप्राध्यापकचफ एकाने उत्तर दिले.
ङ्गका वापरतात?फ
ङ्गआपल्याला जितकी माहिती आहे त्यापेक्षा अधिक माहिती आहे असे विद्यार्थ्यांना वाटावे म्हणून.फ

## ३ Message संदेश



Cute Dada-geeri :-)
Child Prayed God:
“Plz give Me a cycle”
But he didn’t get any cycle...
Next day he stole a Ganesh Statue
&
wrote letter to lord Shiva:
“Agar Bacha chahiye to cycle le kar Mandir aaja”.

## ४ Thought सुविचार




अंधाराची चिंता सोडा आणि प्रकाश उजळा.
**– ओशो**

**अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्रयेण च ज्ञातय: संप्रतवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ३६,श्लोक ३६, महाभारत)**

अर्थ – तळ्यात वाढणाऱ्या कमळाप्रमाणे, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन समुदायाचा उत्कर्ष होत असतो.

# महाशब्दकोड्यांचा मनोरंजक समाचार



## आडवे शब्द

१. धंदा, उद्योग
५. खिशाला खार
९. दिवाळीतील बळीराजाचा दिवस
११. श्रीकृष्णाचे एक नाव
१४. प्रत्येक वर्षी
१६. हिंमत
१८. निमित्त
१९. लहान बाळ
२०. शुभ्र, पांढरा
२२. मातीच्या वासाचे
२४. वरपांगी
२५. अंत:करण
२६. अरण्य
२८. न दबणारे, कडक
२९. दुर्दशा
३०. कंबर
३१. अमृत
३४. समोरासमोरची चकमक
३५. वंदन
३६. नारळाचे झाड
३७. कल्पना मूर्त रूपात आणणारा
३८. उमर
४०. अनावश्यक, नको असता
४२. मयूर
४४. मोठा नगारा
४६. टोळीचा प्रमुख
४८. दुष्ट
४९. पालक पित्यावरून श्रीकृष्णाचे एक नाव
५०. सत्व
५२. तोफगाडी
५४. गणपतीची आई
५५. अर्धांगवायू
५७. लोकोत्तर पुरुष
५९. वाईट सवय
६०. च्या शिवाय
६२. धान्यघर
६५. शेराला कधीतरी भेटणारा
६६. तमाशातील सोंगाड्या
६७. तेज, कांती
६९. भुंगा, भ्रमर
७०. भारवाहक
७१. घाई, त्वरा
७३. जानकी
७४. देहाची खोळ
७६. कळलाव्या मुनी
७८. सत्तेचा खेळ
८०. शिवरायांच्या नंतर ही उपाधी द्यावी असा नेता अद्याप दुर्मिळच!
८१. जमीन
८२.जखमेवरील औषध
८३. केळ्याची गोड जात

## उभे शब्द

२. वस्ती
३. जेव्हा
४. चाहूल, पावलांचा आवाज
६. राजाची कचेरी, राजसभा
७. अनेकांना उकडीचे प्रिय!
८. भीती
९. पदर
१०. बोलणे, वाणी
१२. संधी
१३. उन्हाची तीव्रता
१५. निर्मितीसाठी आवश्यक घटक
१६. प्रवासात सांभाळा!
१७. च्या सह
२१. चटकन
२३. धनुष्याच्या दोरीचा आवाज
२५. कामदेव
२७. अभिनेत्री
२९. बेफाम
३२. धैर्य, साहस
३३. उगीच, अकारण
३४. तात्पर्य
३९. हद्द
४१. साठ मिनिटे
४२. किंमत
४३. पत्रातील वि.वि.
४४. अडत्या
४५. धनी
४७. उंबरठा
४८. छोटा दगड
५०. न्यूनता
५१. षट, अर्धा डझन
५३. समुद्राच्या लाटांचा आवाज
५४. हरिणाचे पिल्लू
५६. मार्गक्रमण
५८. नको असलेला
६१. बाई
६३. भटक्या, गोसावी
६४. बहुरूपी
६६. करून सवरून वेगळा राहणारा
६८. वेदना
७२. अंकुर
७४. भावकी
७५. हुक्की, लहर
७७. दीर्घ श्वास
७९. गोडी

## आडवे उत्तर

१.व्यवसाय ५.पदरमोड ९.पाडवा ११.दामोदर १४.दरसाल १६.साहस १८.कारण १९.बालक २०.धवल २२.मातकट २४.वरवर २५.मन २६.वन २८.टणक २९.अवदसा ३०.कटी ३१.सुधा ३४.सामना ३५.नमस्कार ३६.माड ३७.रचनाकार ३८.वय ४०.नसता ४२.मोर ४४.दमामा ४६.सरदार ४८.खल ४९.नंदलाल ५०.कस ५२.रणगाडा ५४.पार्वती ५५.लकवा ५७.महामानव ५९.खोड ६०.विना ६२.कोठार ६५.सव्वाशेर ६६.नाचा ६७.रया ६९.मधुकर ७०.हमाल ७१.तातडी ७३.सीता ७४.कुडी ७६.नारद ७८.राजकारण ८०.जाणता राजा ८१.भू ८२.मलम ८३.रसबाळी

## उभे उत्तर

२.वसाहत ३.यदा ४.पदरव ६.दरबार ७.मोदक ८.डर ९.पालव १०.वाचा १२.मोका १३.रणरण १५.साधनसामग्री १६.सामानसुमान १७.सकट २१.लवकर २३.टणत्कार २५.मदन २७.नटी २९.अनावर ३२.धाडस ३३.विनाकारण ३४.सार ३९.सीमा ४१.तास ४२.मोल ४३.विनंती विशेष ४४.दलाल ४५.मालक ४७.दारवठा ४८.खडा ५०.कमतरता ५१.सहा ५३.गाज ५४.पाडस ५६.वाटचाल ५८.नकोसा ६१.नार ६३.रमताराम ६४.नकलाकार ६६.नामानिराळा ६८.यातना ७२.डीर ७४.कुणबा ७५.सणक ७७.दम ७९.रस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### मॅच न्यूझीलंडविरुद्ध, पण ९९ भारतीय चाहत्यांना माहित नाही त्यांच्या संघाबद्दलची ही ''अील'' गोष्ट

**गुवाहाटी**–भारत दौऱ्यावर असलेली न्यूझीलंडची क्रिकेट टीम सध्या टी–२० मालिका खेळत आहे. पहिल्या दोन सामन्यात टीम इंडियाने धमाकेदार विजय मिळवत पाच सामन्यांच्या मालिकेत २–० अशी आघाडी घेतली आहे. आता आज होणाऱ्या तिसऱ्या लढतीत कोण बाजी मारते याकडे सर्वांचे लक्ष आहे. मालिकेत आव्हान कायम ठेवण्यासाठी न्यूझीलंडसाठी ही अखेरची संधी असेल. दरम्यान न्यूझीलंडचा संघ एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. मैदानावरील कामगिरीपेक्षा एका जर्सी नंबरने जास्त लक्ष वेधून घेतलं आहे, तो नंबर म्हणजे ६९. क्रिकेटमध्ये जर्सी नंबर हा केवळ आकडा नसतो. तो खेळाडूची ओळख, आवड, कधी कधी भावनिक नातं दर्शवतो.

### चर्चा वैभव-आयुषची पण धमाका भलत्यानेच केला, टीम इंडियाला सापडली हार्दिकची रिप्लेसमेंट

मुंबई–भारतीय क्रिकेट टीमला कपिल देव यांच्यानंतर ऑलराऊंडर शोधण्यात बरीच वर्षं गेली, हा शोध हार्दिक पांड्याच्या रुपात संपला. सध्या हार्दिक पांड्या फास्ट बॉलिंग ऑलराऊंडरची भूमिका चोख पार पाडत आहे, पण त्याला दुखापतींमुळे बऱ्या सामन्यांना आणि महत्त्वाच्या स्पर्धांना मुकावं लागलं आहे. हार्दिक पांड्याचा दुखापतीचा इतिहास बघता टीम इंडियाला अनेकदा दुसरा फास्ट बॉलिंग ऑलराऊंडर नसल्याचा फटकाही बसला आहे, पण आता अंडर–१९ क्रिकेटमध्ये नवा फास्ट बॉलिंग ऑलराऊंडर तयार होत आहे.अंडर–१९ वर्ल्ड कपमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात अंबरीशने ४ विकेट घेतल्या, ज्याबद्दल त्याला प्लेअर ऑफ द मॅच देऊन गौरवण्यात आलं. याशिवाय त्याने अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात एक विकेट घेतली होती.

### ज्या पाकिस्तानी बॉलरमुळे सचिन जगभर चर्चेत आला, त्याच्या मुलाचे हादरवून टाकणारे कृत्य

**इस्लामाबाद**–पाकिस्तान क्रिकेट विश्वासाठी धक्कादायक बातमी समोर आली आहे. पाकिस्तानचे महान लेगस्पिनर अब्दुल कादिर यांचा मुलगा सुलेमान कादिर याच्यावर घरकाम करणाऱ्या महिलेनं लैंगिक अत्याचाराचे गंभीर आरोप केले आहेत. तक्रार दाखल होताच पोलिसांनी सुलमान कादिरला चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. पीडित महिलेच्या एफआयआरनुसार, ती सुलेमान कादिरच्या घरी घरकाम करत होती. कामाच्या निमित्ताने सुलेमानने तिला जबरदस्तीने आपल्या फार्महाऊसवर नेलं आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला, असा आरोप तिने केला आहे. तक्रार नोंदवल्यानंतर महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आलं असून, अहवालानंतर अत्याचाराची अधिकृत पुष्टी होईल, असं पोलिसांनी सांगितलं.

### रोहित-कौरला पद्मश्री पुरस्कार, भारतीयाठी आनंदाची बातमी

मुंबई–भारतीय क्रिकेट संघाचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दबदबा पाहायला मिळत आहे. भारतीय संघाने २०२४ आणि २०२५ मध्ये विश्वचषकावर आपलं नाव कोरलं. २०२४ मध्ये कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारताने टी–२० विश्वचषक आपल्या नावे केला. तर २०२५ मध्ये कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय महिला संघाने वनडे विश्वचषक आपल्या नावे केला. भारतीय क्रिकेटमधील आपल्या अतुल्य योगदानाबद्दल या दोन्ही कर्णधारांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि टीम इंडियाचा टी–२० विश्वचषक व चॅम्पियन्स ट्रॉफी विजेता कर्णधार रोहित शर्मा यांची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

# अवघ्या १० षटकांत किवींचा उडवला धुव्वा



## सूर्या–अभिषेकच्या वादळी खेळीने मालिका खिशात

गुवाहाटी : भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी–२० सामन्यात क्रिकेट विश्वाला अचंबित करणारा विजय नोंदवला आहे. सूर्यकुमार यादव आणि अभिषेक शर्मा यांच्या तुफानी फटकेबाजीच्या जोरावर भारताने केवळ १० षटकांत विजयाचे लक्ष्य गाठून मालिका आपल्या नावावर केली. भारताने या सामन्यात पॉवरप्लेमध्ये धावांचा पाऊस पाडत ऑस्ट्रेलियाचा ८ वर्ष जुना जागतिक विक्रमही मोडीत काढला.

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा भारताचा निर्णय गोलंदाजांनी सार्थ ठरवला. जसप्रीत बुमराहच्या (३ विकेट्स) भेदक माऱ्यासमोर किवी फलंदाजांनी गुडघे टेकले. ग्लेन फिलिप्स (४८) आणि मार्क चॅपमन (३२) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण हार्दिक पांड्या आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी २ बळी घेत न्यूझीलंडला ९ बाद १५३ धावांवर रोखले. १५४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात धक्कादायक झाली. संजू सॅमसन पहिल्याच चेंडूवर बाद झाला. मात्र, त्यानंतर इशान किशन (२८ धावा, १३ चेंडू) आणि अभिषेक शर्मा यांनी १९ चेंडूंत ५३ धावांची वेगवान भागीदारी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजीच्या चिंधड्या उडवल्या. इशान बाद झाल्यानंतर आलेल्या सूर्यकुमार यादवने अभिषेक शर्माच्या साथीने केवळ ४० चेंडूंत १०२ धावांची नाबाद भागीदारी केली.

भारताने पहिल्या ६ षटकांत २ बाद ९४ धावा कुटल्या. ही भारताची पॉवरप्लेमधील दुसरी सर्वोत्तम आणि न्यूझीलंडविरुद्धची सर्वोच्च धावसंख्या ठरली. भारताने २०१८ मधील ऑकलंड येथे ऑस्ट्रेलियाने केलेल्या ९१ धावांचा विक्रम मोडला. अभिषेक शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी आपली वादळी अर्धशतके पूर्ण करत १० व्या षटकांतच भारताला विजय मिळवून दिला. भारताच्या या 'विराट' विजयामुळे न्यूझीलंडचा संघ पूर्णपणे बॅकफूटवर गेला असून भारतीय युवा संघाच्या या आक्रमक शैलीचे जगभर कौतुक होत आहे. रोहित शर्माचा मोडला विक्रम अभिषेक शर्माने न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात तिसरा षटकार मारताच रोहित शर्माचा मोठा विक्रमही मोडीत काढला. याआधी न्यूझीलंड विरुद्धच्या द्विपक्षीय टी–२० मालिकेत सर्वाधिक १० षटकारांचा विक्रम हा रोहित शर्माच्या नावे होता. अभिषेक शर्माने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या दोन सामन्यात ८ षटकार मारले होते. तिसऱ्या टी–२० सामन्यात त्याने रोहित शर्माला मागे टाकत न्यूझीलंडविरुद्धच्या टी–२० मालिकेत सिक्सर किंग होण्याचा नवा रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकमेव कसोटीसाठी भारतीय संघाची घोषणा



मुंबई : भारतीय क्रिकेट महिला निवड समितीने ऑस्ट्रेलिया दौर्यावर होणार्या एकमेव कसोटी सामन्यासाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. ज्यामध्ये स्टार खेळाडूंचा समावेश आहे.

पायाच्या दुखापतीमुळे बराच काळ मैदानाबाहेर असलेली स्टार सलामीवीर प्रतीका रावल देखील संघात परतली आहे.प्रतिकाला विश्वचषकादरम्यान दुखापत झाली आणि तेव्हापासून ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून दूर आहे. परंतु, आता ती ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतून मैदानात पुनरागमन करेल. या दौर्यासाठी एकदिवसाच्या आणि टी–२० संघात तिचा समावेश नव्हता. प्रतिका आणि शेफालीपैकी कोणाला कसोटीत डावाची सुरुवात करण्याची संधी मिळते? हे पाहणे बाकी आहे.भारतीय संघ लवकरच ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. या दौर्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ टी–२०, ३ एकदिवसीय सामना आणि एकमेव कसोटी सामना खेळला जाणार आहे. हा दौरा फेब्रुवारीच्या मध्यात सुरू होईल.मालिकेची सुरुवात तीन टी–२० सामन्यांनी होईल आणि त्यानंतर तीन एकदिवसीय सामन्यांसह होईल. शेवटी पर्थ मैदानावर ६ ते ९ मार्च दरम्यान एकमेव कसोटी सामना खेळला जाईल. या सामन्यात हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करेल, तर स्मृती मानधना उपकर्णधार असेल.

| सामना | तारीख | ठिकाण वेळ (भारतीय प्रमाणवेळेनुसार) |
|---|---|---|
| पहिला टी–२० सामना | १५ फेब्रुवारी, २०२६ | सिडनी दुपारी १:३० वा. |
| दुसरा टी–२० सामना | १९ फेब्रुवारी, २०२६ | कॅनबरा दुपारी १:३० वा. |
| तिसरा टी–२० सामना | २१ फेब्रुवारी, २०२६ | डलेड दुपारी २:०० वा. |
| पहिला एकदिवसीय सामना २४ फेब्रुवारी, २०२६ | २४ फेब्रुवारी, २०२६ | ब्रिस्टेन सकाळी ९:०० वा. |
| दुसरा एकदिवसीय सामना | २७ फेब्रुवारी, २०२६ | होबार्ट सकाळी ९:०० वा. |
| तिसरा एकदिवसीय सामना | १ मार्च, २०२६ | होबार्ट सकाळी ९:०० वा. |
| कसोटी सामना | ६ – ९ मार्च, २०२६ | पर्थ सकाळी ११:०० वा. |

भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा–ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा कसोटी संघ

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, अमनजोत कौर, रिचा घोष (यष्टीरक्षक), उमा छेत्री, प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, रेणुका रावल, स्मृती, कृष्णा, कृष्णा, रेणुका शर्मा, सायली सातघरे.

# युवा भारतीय संघाचा एकतर्फी विजय

बुलावायो : आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेतील यंदाच्या हंगामातील साखळी फेरीत विजयी हॅटट्रिकचा डाव साधला आहे. या दमदार कामगिरीसह युवा भारतीय संघाने यंदाचा हंगामातील विजेतेपदाची आपली दावेदारी अधिक भक्कम केली आहे. अमेरिका आणि बांगलादेशला दणका दिल्यावर तिसर्या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडला एकतर्फी मात दिली. भारत–न्यूझीलंड अंडर १९ संघातील सामना बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लबच्या मैदानात खेळवण्यात आला. आयुष म्हात्रेनं नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याच निर्णय घेतला. पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना प्रत्येकी ३७–३७ षटकांचा खेळवण्यात आला. पण न्यूझीलंडच्या संघाला ही षटकाही पूर्ण खेळता आली नाहीत. आरएस अंब्रिश आणि हेनिल पटेल यांच्या भेदक मार्यासमोर न्यूझीलंडचा संघ ३६.२ षटकात १३५ धावांवर आटोपला. अंब्रिशनं युवा टीम इंडियाकडून सर्वाधिक ४ तर हेनिल पटेल याने ३ बळीचा डाव साधला. याशिवाय खलिन पटेल. मोहम्मद एनान आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतली.

न्यूझीलंडने दिलेल्या माफक धावसंख्येचा पाठलाग करताना एरॉन जॉर्ज आणि वैभव सूर्यवंशी जोडीनं भारताच्या डावाची सुरुवात केली. धावफलकावर ११ धावा असताना एरॉन जॉर्ज ७ धावा करून माघारी फिरला. त्यानंतर आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी जोडी जमली. दोघांनी तिसर्या विकेटसाठी ३९ चेंडूत ७६ धावांची भागीदारी रचली. वैभव सूर्यवंशी २३ चेंडूत ४० धावांवर बाद झाल्यावर आयुष म्हात्रेनं ण१९ वर्ल्ड कप स्पर्धेतील आपले पहिले अर्धशतक साजरे केले. त्याने २७ चेंडूत २ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने ५३ धावा केल्या. विहान मल्होत्रा १७ (१३) आणि वेदांत त्रिवेदी १३ (१२)यांनी १४ व्या षटकातील तिसर्या चेंडूवर संघाचा विजय निश्चित केला.

# नोव्हाक जोकोविच ४०० ग्रँड स्लॅमचा मानकरी

मेलबर्न: नोव्हाक जोकोविचने जानेवारी २०२६ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत ग्रँड स्लॅम इतिहासात ४०० सामने जिंकणारा पहिला खेळाडू बनण्याचा बहुमान मिळवला. जोकोविचने ४०० वा ग्रँड स्लॅम विजय नोंदवून टेनिस जगतात एक नवा विक्रम साकारला आहे. ऑस्ट्रेलियन ओपनच्या सामन्यांदरम्यान हा टप्पा गाठला गेला.

यापूर्वी ग्रँड स्लॅममध्ये सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम रोजर फेडररच्या नावावर होता, जो आता जोकोविचने मोडीत काढला आहे. सर्बियाचा विक्रमवीर टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणखी एका ऐतिहासिक यशाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला आहे. जोकोविचने गुरुवारी इटलीच्या फ्रान्चेस्को मास्ट्रेलीचा ६–३, ६–२, ६–२ असा पराभव करत ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेची तिसरी फेरी गाठली. ग्रँडस्लॅम कारकीर्दीत हा त्याचा ३९९वा विजय ठरला. त्यानंतर त्याने चौथ्या मानांकित जोकोविचने नेदरलँड्सच्या बोटिक वॅन डे झँडशूल्प याला हरविले. त्यामुळे ४०० ग्रँडस्लॅम सामने जिंकणारा पहिला टेनिसपटू ठरला.पुरुष एकेरीतील सर्वाधिक २४ ग्रँडस्लॅम जेतेपदांचा मानकरी



जोकोविचला ऑस्ट्रेलियन स्पर्धेत दुसर्या फेरीचा अडथळा पार करण्यासाठी फारसा संघर्ष करावा लागला नाही. त्याने जागतिक क्रमवारीत १४१व्या स्थानी असलेल्या मास्ट्रेलीची सर्व्हिस सहा वेळा तोडली, तर मास्ट्रेलीला केवळ एकदा जोकोविचची सर्व्हिस मोडता आली. ''अगदी खरे सांगायचे तर मला मास्ट्रेलीबद्दल कालपर्यंत फारशी माहिती नव्हती. मात्र, मी सर्वच टेनिसपटूंचा आदर करतो. प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक मी कधीही करत नाही.

# कोलकाता, मुंबईमध्ये होणार स्कॉटलंडचे सामने

नवी दिल्ली : हाती आलेल्या अहवालानुसार आयसीसीने अधिकृतपणे टी २० विश्वचषकामध्ये स्कॉटलंडला स्थान दिले आहे. ते आता बांगलादेशाच्या जागी क गटात खेळतील. स्कॉटलंडचे तीन सामने कोलकाता येथील ईडन गार्डन्समध्ये होतील. तर, एका सामना मुंबईत होणार आहे. स्कॉटलंडला वेस्ट इंडिज, इटली आणि इंग्लंड विरुद्ध कोलकाता येथे खेळावे लागेल. तर, १७ फेब्रुवारीला मुंबईत त्यांचा सामना नेपाळ सोबत होईल.

बांगलादेशात २ हिंदू तरुणांची हत्या झाल्यानंतर भारतात केकेआरचा विरोध सुरु झाला होता. केकेआरनं मुस्तफिजूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना टीममध्ये घेतलं होतं. यानंतर केकेआरनं बीसीसीआयच्या आदेशानं बांगलादेशचा खेळाडू मुस्तफिजूर रहमानला संघातून वगळण्याचा निर्णय घेतला. यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डानं तातडीनं बैठक बोलावली आणि त्यांनी टी २० वर्ल्ड कपचे सामने श्रीलंकेत खेळवावेत अशी भूमिका घेतली. मात्र, बीसीसीआयनं त्याला नकार दिला. लॉजिस्टिक, हॉटेल बुकिंग आणि इतर गोष्टींमध्ये बदल अशक्य असल्यानं बीसीसीआय त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिली.

बांगलादेशाचे होणार २४० कोटींचे नुकसान

बांगलादेश क्रिकेट बोर्डाने त्यांचा संघ आयसीसी टी–२० विश्वचषकासाठी भारतात न पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय बांगलादेश सरकारचा असून बांगलादेश क्रिकेट बोर्डाचा नसल्याचे देखील त्यांनी सांगितले. बांगलादेशाने टी २० विश्वचषकाचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळवावेत, अशी मागणी केली होती. मात्र, आयसीसीने बांगलादेशाची मागणी फेटाळून लावली होती. आयसीसीने टी २० विश्वचषकाच्या वेळापत्रकात बदल करण्यास नकार दिला होता.

बांगलादेश सरकारच्या आदेशाने बीसीबीने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतला.

आयसीसी बांगलादेशाच्या या निर्णयांतर स्कॉटलंडला टी २० विश्वचषकामध्ये संधी देऊ शकते. टी–२० विश्वचषकामधून बाहेर गेल्याने बांगलादेशाला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. पीटीआयच्या अहवालानुसार टी २० विश्वचषक न खेळल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाला २४० कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते. यामध्ये ब्रॉडकास्टिंग रेवेन्यू, स्पॉन्सरशिप, वार्षिक उत्पन्नाचा समावेश आहे. रिपोर्टनुसार बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे मोठे वार्षिक नुकसान ६० टक्के होवू शकते.

बांगलादेशाचे क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल यांनी खेळाडूंसोबत बैठक घेत आयसीसीचा सुरक्षा रिपोर्ट मान्य नसल्याचे म्हटले भारतात आमचे खेळाडू, पत्रकार आणि प्रेक्षक सुरक्षित राहतील याबाबत आम्ही समाधानी नाही. हा निर्णय सरकारचा असून नागरिकांची सुरक्षा आमची प्राथमिकता आहे. बांगलादेशाने अद्याप आशा सोडलेली नाही. आयसीसीने न्यायाची भूमिका घेत आमच्या संघाला श्रीलंकेत खेळण्यास मंजुरी द्यावी, असे आसिफ नजरुल यांनी म्हटले.





बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे या निर्णयामुळे २४० कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. बांगलादेशाचे क्रिकेट चाहते भारतात येऊन मॅचेस पाहतात. बांगलादेशाने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा थोडासा परिणाम भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या कमाईवर होऊ शकतो. बांगलादेश टी २० विश्वचषकामध्ये ४ सामने खेळणार होते. तीन सामने कोलकाता आणि एक सामना बांगलादेशामध्ये होणार होता. बांगलादेश भारतात न खेळल्याने ३० ते ६० कोटींचे नुकसान होऊ शकते.

आयसीसीने बांगलादेशावर अन्याय केला : मोहसीन नक्वी

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि गृहमंत्री मोहसीन नक्वी यांनी मोठे वक्तव्य केले आहे. आयसीसीनं बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला संधी दिली आहे. या निर्णयाचा विरोध करत मोहसीन नक्वीनं पाकिस्तान क्रिकेट बोर्ड बांगलादेश सोबत असल्याचं म्हटलं आहे. पाकिस्तान सरकारनं सांगितल्यास आम्ही टी २० वर्ल्ड कपमध्ये खेळणार नाही, आयसीसीनं २२ व्या संघाला संधी द्यावी, असं मोहसीन नक्वींनी म्हटलं आहे.

बांगलादेशवर हा अन्याय करण्यात आला आहे.मी आयसीसीच्या बैठकीत देखील हेच म्हटलं होतं. तुम्ही दुटप्पी भूमिका घेऊ शकत नाही, तुम्ही असू म्हणू शकत नाही की एका देशासाठी तुम्हाला हवं असतं तेव्हा एक निर्णय घेता आणि दुसर्या देशासाठी तुम्ही बरोबर विरुद्ध निर्णय घेता. बांगलादेशनं कोणत्याही स्थितीत टी २० वर्ल्ड कपमध्ये खेळलं पाहिजे. ते देखील मोठे स्टेक होल्डर्स आहेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, असं मोहसीन नक्वीनं म्हटलं. पाकिस्तान सरकारनं जर आम्हाला या वर्ल्ड कपमध्ये खेळू नये असं सांगितलं तर आयसीसीनं २२ वा संघाला संधी द्यावी. आम्ही आयसीसीपेक्षा पाकिस्तान सरकारला बांधील आहोत. पाकिस्तान सरकार जे सांगेल ते आम्ही करु, असं मोहसीन नक्वी यांनी म्हटलं आहे.

पाकिस्तान सरकारमध्ये गृहमंत्री असणारे मोहसीन नक्वी आशिया कप वेळी चर्चेत आले होते. मोहसीन नक्वींच्या हस्ते आशिया कपची ट्रॉफी स्वीकारण्यास भारतीय संघानं नकार दिला होता. त्यानंतर मोहसीन नक्वी आशिया कपची ट्रॉफी घेऊन निघून गेले होते. अद्याप भारतीय संघाला आशिया कपची ट्रॉफी मिळालेली नाही. बीसीसीआयनं आशिया कप ट्रॉफीचा मुद्दा आयसीसीसमोर देखील नेला होता.

बांगलादेशनं आयसीसीकडे सुरक्षेचं कारण देत त्यांचे टी २० वर्ल्ड कप २०२६ मधील सामने श्रीलंकेत खेळवावेत अशी मागणी केली होती. आयसीसीनं बांगलादेशची मागणी फेटाळली होती. त्यानंतर बांगलादेशनं त्यांचा स्पर्धेतील ग्रुप बदलावा, अशी मागणी देखील केली. मात्र, ती देखील फेटाळण्यात आली. यानंतर आयसीसीनं बांगलादेशला निर्णयासाठी २१ जानेवारीपर्यंत मुदत दिली होती. मात्र, बांगलादेश सरकारनं त्यांचा क्रिकेट संघ भारतात पाठवण्यास नकार दिला, असं म्हणत बांगलादेश क्रिकेट बोर्डानं स्पर्धेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आढावा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूका ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर जिल्हानिहाय तयारीचा आढावा आज राज्य निवडणूक आयूक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला.



विभागात करण्यात आलेल्या निवडणुकांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करून मतदान प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पडेल आणि मतदानाच्या टक्केवारीत आणखी वाढ होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी आणखी मोठ्याप्रमाणात जनजागृती करण्याच्या सुचनाही सर्व प्रशासकीय यंत्रणांना दिल्या.

येथील विभागीय आयुक्त कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव सुर्या कृष्णमुर्ती, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनय राठोड, परभणीचे पोलीस अधीक्षक विरेंद्रसिंह परदेशी, धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खोकर प्रत्यक्ष उपस्थित होते. तर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप, लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे व सागर पाटील सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

मतदानाविषयी जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार जनजागृती(स्वीप)उपक्रमांचे श्री. वाघमारे यांनी कौतुक करत इतर जिल्ह्यांनीही मतदार जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याचेही निर्देश दिले. तसेच मतदान करण्याच्या प्रकियेविषयी मतदारांमध्ये विविध प्रसिद्धी माध्यमांतून जनजागृती करावी, वृध्द(वय ८० वर्षावरील), गरोदर महिला, दिव्यांग व्यक्ती यांना मतदान करणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात याव्यात. मतदार याद्यांतील दुबार मतदारसंख्या कमी करण्याच्या दृष्टीने दुबार नाव नोंदणी असलेल्या मतदारांकडून संमंतीपत्रे भरून घेण्याचे काम गांभीर्याने करावे. त्याचबरोबर आचारसंहिता काळात प्रशासनाने केलेल्या कारवाईसही विविध माध्यमांव्दारे प्रसिद्धी देण्याच्या सूचना श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

राज्य निवडणूक आयोग २०१० पासून मतदानावेळी मार्कर पेनची शाई वापरत आहे. परंतू यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी लोकसभा, विधानसभा निवडणूकीप्रमाणे म्हैसूर शाईचा वापर करण्यात येणार असल्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरक्षितरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदारांच्या प्रमाणात पुरेसे मतदान केंद्रे, इव्हिएम मशीनची उपलब्धता, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांची व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचारी यांचे आवश्यक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही, स्ट्राँगरूमची व्यवस्था व सुरक्षा करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहे, याबाबत संगणकिय सादरीकरण केले.

मतदार याद्यांतील दुबार नावांच्याबाबत कारवाई करण्यात येऊन दुबार मतदारांकडून दुबार मतदान करणार नसल्याचे संमंतीपत्रे भरुन घेण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याचबरोबर आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये म्हणून सर्व राजकिय पक्षांशी संवादावर भर दिला जात आहे. तर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांसोबत वेळोवेळी बैठका व संवाद करण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच सर्व पोलीस अधीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडिओ सर्वेक्षक पथके, वॉरंट बजावणी, अवैध्य मद्य विक्री वर कारवाई व कायदासुव्यस्थेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगून मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी बंदोबस्तकामी मनुष्यबळाची उपलब्धता व आवश्यकता आदीबाबत माहितीचे संगणकिय सादरीकरण केले.

पोलीस महानिरिक्षक वीरेंद्र मिश्र, नांदेड विशेष पोलीस महानिरिक्षक शहाजी उमाप यांनीही जिल्ह्यांत निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यस्था राखण्यात येत असल्याचे सांगत संवेदनशिल मतदान केंद्रे असलेल्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

जिल्ह्यांच्या सीमा भागात नाका बंदी करण्यात येत असून करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईसंदर्भात माहिती दिली. तसेच निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

## हिंद-दी-चादर समागम कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी भाविकांची अलोट गर्दी



**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांसह लाखो भाविकांनी वाहे गुरु व बोले सो निहाल सत श्री अकाल च्या जयघोषात श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

आज दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

देशातील विविध राज्यातून आलेल्या सर्व धर्माच्या भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत.

भाविकांच्या सोयीसाठी

आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी भाविकांसाठी लोकसहभागातून चहा, अल्पोपहार, ज्यूस, विविध स्टॉल उभारण्यात आलेले आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश दिला जात आहे.

## नांदेडच्या भूमीवर होणारा शहीदी समागम राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक: मुख्यमंत्री भगवंत मान

**नांदेड/प्रतिनिधी :** सचखंड श्री हजूर साहिब ही श्रद्धा आणि त्यागाची पवित्र भूमी आहे. या भूमीवर होणारा शहीदी समागम हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. विविध समाजातील लोक एकत्र येऊन हा सोहळा साजरा करत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले.



हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्या संयुक्त विद्यमाने मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री श्री. मान यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या.

सेवा हाच खरा धर्म आहे. या सोहळ्यातून समता, बंधुता आणि करुणेचा संदेश देशभर पोहोचत आहे. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. त्यांचे कार्य, त्याग व विचार येणाऱ्या पिढीसमोर असणे अत्यंत आवश्यक असल्याचे श्री. मान यांनी सांगितले. नांदेड येथील पंजाब भवनचे अद्ययावतीकरण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे कार्य पुढील पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पुढाकार : राज्य समन्वयक रामेश्वर नाईक

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास घराघरात पोहोचला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्यातील शाळा, महाविद्यालयात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनावरील माहितीपट, गीत दाखविण्यात येत असून यामाध्यमातून त्यांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहचला आहे. नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत होत असलेल्या या कार्यक्रमात विविध राज्यातून भाविक दाखल होत आहेत. हा कार्यक्रम सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारा ठरणार आहे, असे राज्य समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी यावेळी सांगितले.

राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार डॉ. तुषार राठोड, संत ज्ञानी हरनाम सिंग, पोहरादेवीचे महंत बाबुसिंग महाराज, संत बाबा बलविंदर सिंग, महंत रघु मुनी यांच्यासह संत, महंत यावेळी उपस्थित होते.

## कष्टकरी शेतकऱ्यांच्या शेतशिवारातील पाणबुडी मोटर व म्हशी चोरी करणाऱ्या संघटित टोळीचा पर्दाफाश, चार आरोपी जेरबंद, ९.२६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी तसेच परवाना असलेल्या हॉटेल व बिअर बार फोडून विदेशी दारू चोरी करणाऱ्या संघटित टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत नियोजनबद्ध व धाडसी कारवाई केली आहे. या कारवाईत चार सराईत आरोपींना अटक करून तब्बल ९,२६,२४०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २४/०१/२०२६ रोजी मा. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व मा.अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वात विशेष पोलीस पथकाची निर्मिती करण्यात आली. सदर पथक मुरुडअकोला परिसरात लातूर जिल्ह्यात घडलेल्या शेतातील साधनसामग्री चोरीतील संशयित गुन्हेगारांचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर ते मुरुड जाणाऱ्या रस्त्यावर करकटा पाटी येथील एका बार समोर पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहना सह चार संशयित इसम संशयास्पदरीत्या थांबले आहेत . या माहितीच्या आधारे तात्काळ नियोजनबद्ध सापळा रचण्यात आला. दुपारी १४.३० वाजता संशयित वाहनासह खालील चारही इसमांना ताब्यात घेण्यात आले.

१) महादेव उर्फ बापु सुरेश चव्हाण, वय ४५ वर्षे रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव २) राहुल निवत्ती काळे, वय २३ वर्षे रा. साठे चौक, धाराशिव, जि. धाराशिव ३) तेजस उर्फ पप्पु भिमराव शिंदे, वय ३५ वर्षे रा. पिंपळगाव, ता. वाशी, जि. धाराशिव ४) नितीन गजेंद्र काळे, वय ३२ वर्षे रा. राजेशनगर, ढोकी, ता. वाशी, जि. धाराशिव

असे असून त्यांची अंगझडती व वाहन तपासणी केली असता त्यामध्ये रोख रक्कम : ₹१,५७,०००/-, ५ एचपी क्षमतेच्या १० पाणबुडी मोटारी, विदेशी दारूचे २३ बॉक्स,गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेले महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप वाहन (एम.एच. ४४ यू १३१६) असा मुद्देमाल मिळून आला. नमूद आरोपींची सखोल चौकशी केली असता आरोपींनी कबुली दिली की, ते आपल्या इतर तीन फरार साथीदारांसह गेल्या एक वर्षापासून लातूर, धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत शेतशिवारातील पाणबुडी मोटारी, स्प्रिंकलर सेट, म्हशी चोरी करीत होते. तसेच काही दिवसांपूर्वी वैराग जिल्हा सोलापूर परिसरातील एक बिअर बार अँड परमिट रूम फोडून मोठ्या प्रमाणावर विदेशी दारू चोरी केली होती. विविध चोरीचा माल विकून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात आढळून आलेली रोख रक्कम असल्याचे सांगितले.

आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे जिल्ह्यातील पुढील पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांशी त्यांचा थेट संबंध असल्याची खात्री झाली पो.स्टे. मुरुड, शिरूर अनंतपाळ, अहमदपूर, कासार शिरसी, वैराग (जि. सोलापूर) इत्यादी ठिकाणी दाखल असलेले एकूण १० गंभीर गुन्हे उघड झाले असून या कारवाईत एकूण १० पाणबुडी मोटारी ₹७१,८००/- , विदेशी दारू : ₹१,९७,४४०/-,रोख रक्कम : ₹१,५७,०००/-,बोलेरो पिकअप वाहन : ₹५,००,०००/-एकूण किंमत : ₹९,२६,२४०/- (नऊ लाख सव्वीस हजार दोनशे चाळीस रुपये)

सदर सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चारही आरोपींना पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन मुरुड गुन्हा क्र. ३९३/२०२५, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये हजर करण्यात आले आहे. त्यांच्या फरार साथीदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली असून, लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार आहे.




ही कारवाई लातूर जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे, तांत्रिक कौशल्याचे आणि गुन्हेगारांविरोधातील कठोर भूमिकेचे उत्तम उदाहरण आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाने मिळवलेल्या मालमत्तेवर होणाऱ्या चोरीला आळा घालणे, व्यापाऱ्यांचे संरक्षण करणे आणि समाजात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हा पोलीस प्रशासनाचा दृढ संकल्प आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, अमर केंद्रे , राजेश घाडगे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे,तुराब पठाण, रामलिंग शिंदे,राजेश कंचे,मोहन सुरवसे,तुळशीराम बरुरे, पाराजी पुट्टेवाड, गणेश साठे,गोविंद भोसले, चंद्रकांत केंद्रे,प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे,शैलेश सुडे, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## मांजरा महिला अर्बन को -ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीत हळदी -कुंकू समारंभ उत्साहात

### चेअरमन प्रियांका सुरवसे यांनी केले महिलांचे स्वागत, दिनदर्शिकेचे प्रकाशन करून वानाचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** मकर संक्रांती निमित्त मांजरा महिला अर्बन कॉ -ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कार्यालयात २४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत महिलांसाठी हळदी -कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या सोसायटीच्या चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्त्यां, उद्योजक प्रियांका सुरवसे आणि त्यांच्या महिला कर्मचाऱ्यांनी सर्व महिलांचे कुंकू लावून आणि वाणाची स्नेहभेट देऊन स्वागत केले. त्यानंतर जमलेल्या प्रत्येक महिलांनी उखाणे घेतले. उखान्याचा कार्यक्रम चांगलाच रंगला. उपस्थित महिलांसाठी स्वादिष्ट अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. हळदी कुंकूवा निमित्त मांजरा महिला क्रेडिट सोसायटीतर्फे १३ महिन्याच्या ठेवीवर १२ टक्के व्याजदर देण्यात येणार आहे. या संधीचा महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन चेअरमन प्रियांका सुरवसे यांनी यावेळी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या चेअरमन प्रियांका सुरवसे, सचिव रोहिणी धायगुडे, व्यवस्थापक आदर्श कांबळे आणि कर्मचारी, अभिजीत कांबळे, सोहेल पठाण, सुरज उदारे, दुर्गेश डूमने, ऐश्वर्या पाटील, धनश्री अडसूळ, अनिता गोडपटले व इतर कर्मचारी महिलांनी परिश्रम घेतले.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बापूजींचे कार्य शैक्षणिक इतिहासातील सुवर्णपान– डॉ.देशमुख यांचे प्रतिपादन



धाराशिव (प्रतिनिधी)–स्वातंत्र्योत्तर काळातील खऱ्या अर्थाने शेवटचा महत्त्वाचा दुवा म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे होत. त्यांचे कार्य हे महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील सुवर्णपान आहे असे व्याख्यानमाले ज्येष्ठ मराठी साहित्यिक डॉ. देशमुख यांनी प्रतिपादन केले.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व रामकृष्ण परमहंस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुंफताना ज्येष्ठ मराठी साहित्यिक डॉ. शिवाजीराव देशमुख हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संदीप देशमुख म्हणाले की, बापूजींच्या विचारांचा महाराष्ट्रभर जागर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण आपला इतिहास विसरता कामा नये. आधुनिक जगात माणूस एक वाटसरू आहे आणि बापूजींच्या विचारांमुळे या वाटसरूला ज्ञानाचा महामार्ग नक्कीच सापडेल. या कार्यक्रमास माजी विद्यार्थिनी तृषाली साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. मदनसिंह गोलवाल, डॉ. मंगेश भोसले, प्रा. विवेकानंद चव्हाण, डॉ. बालाजी गुंड, प्रा. बबन सूर्यवंशी, प्रा. सचिन चव्हाण, डॉ. मारुती लोंढे, डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. केशव क्षीरसागर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

आयुष्यभर निरिच्छ वृत्तीने सेवा केली बापूजींच्या विचारांवर महाराष्ट्र घडत आहे. मात्र शिक्षक व प्राध्यापकांनी अधिक पुढाकार घेणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील खऱ्या अर्थाने शेवटचा महत्त्वाचा दुवा म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे होत. त्यांचे कार्य हे महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील सुवर्णपान आहे. १२ जून १९५४ रोजी काही निवडक व विश्वासू सहकाऱ्यांसह त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणाच्या माध्यमातून माणूस ज्ञानी व सुसंस्कृत व्हावा, हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी हे महान कार्य हाती घेतले. ज्ञानवर्धन, ज्ञानसंवर्धन व ज्ञानदान हेच आपले जीवनकार्य मानून त्यांनी आयुष्यभर निरिच्छ वृत्तीने सेवा केली.

बापूजींच्या शैक्षणिक विचारांमुळे महाराष्ट्र अधिक समृद्ध होईल, असे अनमोल मार्गदर्शन डॉ.शिवाजीराव देशमुख यांनी केले.

# नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा लघुउद्योग सुरू करावा:जवाहर महाविद्यालयातील आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेत अरविंद जोशी

अणदूर(प्रतिनिधी)– विद्यार्थ्यांना उद्योग, व्यापार, व्यवसाय, सेवाक्षेत्र आदी ठिकाणी लघुउद्योग करण्याच्या भरपूर संधी उपलब्ध असल्याचे सांगून तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा लघुउद्योग चालू करावा. नोकरी मागणाऱ्या पेक्षा नोकरी देणारे अशी आपली ओळख निर्माण करावी. असे अरविंद जोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले.



जवाहर महाविद्यालयात वाणिज्य विभाग व विद्यार्थी विकास विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार (दि.२३) रोजी उद्योजकता विकास कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेचे उदघाटन अरविंद जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक अनिल कुमार साळुंखे यांनी जिल्हा उद्योग केंद्राकडून विविध योजना विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर तिसऱ्या सत्रात रुद्रवाडी येथील महिला उद्योजक कविता शिंदे-भोसले यांनी त्यांच्या खेडेगावात सुद्धा पाच दाळ मिल, ऑइल मिल आदी उद्योग गावातील बचत गटामार्फत चालू असल्याचे सांगितले तसेच त्यांनी या गृह उद्योगांमध्ये येणाऱ्या अडचणी संबंधी प्रकट मुलाखत व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ.एस. जी.बिराजदार व सूत्रसंचालन डॉ.एम.बी.बिराजदार यांनी केले.

प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी उदघाटन समारोप सत्रात विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसायासंबंधी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.एम.एम.लंगडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, प्रोफेसर डॉ. डी.डी.कदम तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

भांडवल विरहित सुद्धा उद्योगाचे अनेक पर्याय भांडवल विरहित सुद्धा अनेक उद्योग करता येतात जसे की शिकवणी वर्ग चालवणे, व्याख्यान देणे अशा अनेक सेवा क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी डाळ उद्योग,हळद पावडर, रसवंती गृह या कच्च्या मालापासून पक्के माल तयार करणे मुलींसाठी बचत गट चालवणे व त्या मार्फत गृह उद्योग चालवणे अशा भरपूर संधी असल्याचे सांगितले. यासाठी शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान उपलब्ध आहे तसेच कर्ज मिळण्याच्या सुविधा आहेत याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन केले.

# राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जागृती करणे: गटशिक्षणाधिकारी हाके



परंडा(प्रतिनिधी)–राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करणे असे मत गटशिक्षणाधिकारी सूर्यभान हाके यांनी रा.गे. शिंदे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोपप्रसंगी व्यक्त केले.

तालुक्यातील बोडखा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास उपप्राचार्य डॉ.महेशकुमार माने, सरपंच विठ्ठल करडे, उपसरपंच नागनाथ काकडे, मुख्याध्यापक सुरेश चांदणे, नागनाथ उकिरडे, प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे, डॉ.गजेंद्र रंदील, डॉ.अरुण खर्डे, कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक तोडकरी, प्रा.जगन्नाथ माळी आदींची उपस्थिती होती. सुर्यभान हाके पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी देशांमध्ये असमानता अंधश्रद्धा भ्रष्टाचार अशा घटना घडत आहेत अशा घटना घडू नये यासाठी विद्यार्थ्यांनी शिबिराच्या माध्यमातून पुढाकार घेऊन या गोष्टी नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

शिबिरामध्ये विद्यार्थी व समाज परस्पर संबंध या विषयावर डॉ.शहाजी चंदनशिवे यांनी तर वृक्षारोपण काळाची गरज या विषयावर डॉ.सचिन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्रात ऐआय तंत्रज्ञानाचा फायदा या विषयावर तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, समाज प्रबोधन अशोक महाराज पाटील, बँकांचे कृषी विषयक धोरण या विषयावर डॉ.अरुण खर्डे यांनी मार्गदर्शन केले. तसेच शिबिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सात दिवसाचा वृत्तांत कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक तोडकर यांनी सांगितला. कार्यक्रमाचे सहाय्यक म्हणून शिक्षकेतर कर्मचारी उत्तम माने, संतोष राऊत, धनंजय गायकवाड व सुनंदा कोठुळे यांनी सहकार्य केले. आभार प्रा.जगन्नाथ माळी यांनी मानले.

# विज्ञान प्रदर्शनात महिलांसाठी सुरक्षा छत्री'ला द्वितीय क्रमांक मुळज पीएमश्री जि. प. प्रशालेच्या प्रयोगाची राज्यस्तरीय निवड



उमरगा (प्रतिनिधी)– उमरगा राज्य विज्ञान शिक्षण संस्था रवीनगर नागपूर आणि जिल्हा शिक्षण विभाग, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाच्या विद्यमाने ५३ वे जिल्हास्तरीय गणित विज्ञान पर्यावरण प्रदर्शन सोहळा २०२५-२६ श्री तुळजाभवानी सैनिक विद्यालय येथे आयोजित करण्यात आले होता. या दोन दिवसीय प्रदर्शन व पारितोषिक वितरण सोहळ्याचे डायटचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे अध्यक्षस्थानी होते. माध्यमिक शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, मंदिर संस्थानचे अध्यक्ष तहसीलदार श्रीमती माया माने, उपशिक्षणाधिकारी दिनकर होळकर, उपशिक्षणाधिकारी संतोष माळी, डायट अधिव्याख्याता प्रदीप घुले, जिल्हा विज्ञान मंडळ अध्यक्ष रवींद्र स्वामी, तालुकाध्यक्ष श्री पाटील, तुळजाभवानी सैनिक स्कूल प्राचार्य वैजनाथ घोडके उपस्थित होते. या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून जिल्ह्यातील २४ शाळांनी सहभाग घेतला. माध्यमिक गटातून मुळजच्या पीएमश्री जिल्हा परिषद प्रशालेची वैष्णवी बालाजी काळे, साधना राम दंडगुले व मार्गदर्शक शिक्षिका अनिता माने, ताजोद्दीन सरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी सुरक्षा छत्री प्रयोग साजरीकरण करून यांनी जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक मिळवून प्रयोगाची राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या घवघवीत यशाबद्दल प्राचार्य व माध्यमिक शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, संतोष माळी, गट शिक्षणाधिकारी अमोल राजपूत, तुरोरी केंद्राचे केंद्रप्रमुख सुशीलकुमार चौगुले, विज्ञान साधन व्यक्ती पार्वती माशाळकर, मुळजच्या सरपंच सौ शिवकन्या शिंदे, ग्रामशिक्षण समिती अध्यक्ष संजय मुगळे, मुख्याध्यापक वसंत जाधव, सर्व शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी राज्यस्तरीय निवड झाल्याने विद्यार्थ्यांचे कौतुक, अभिनंदन करत पुढील सादरीकरणाला शुभेच्छा दिल्या.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# उमरगा तालुक्यात निवडणुकीसाठी २५३ उमेदवार रिंगणात जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी छाननी प्रक्रिया पूर्ण

उमरगा, पुढारी वृत्तसेवा: तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीत २७० उमेदवारांनी ५४० नामनिर्देशन पत्राची खरेदी केली होती. दोन्ही मिळून १६३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दाखल अर्जाची छाननी प्रक्रिया गुरूवारी (दि २२) पार पडली. छाननीत जिपचे ९० जणांचे तर पंचायत समिती गणांसाठी १६३ जणांचे अर्ज वैध ठरले.

उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद ९ गट व पंचायत समिती १८ गण निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदती अखेरपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत २७० जणांनी ६३९ उमेदवारी अर्ज घेतले होते. यात जिप २७८ तर पंचायत समिती ३६१ अर्जाचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत बुधवारी दुपारी तीन वाजता संपली. जिल्हा परिषद गटासाठी ९० जणांनी ११८ तर पंचायत समिती गणासाठी १६३ जणांनी १९८ दोन्ही मिळून २५३ जणांनी ३१६ उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

तहसील कार्यालयात गुरुवारी, (दि २२) निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद येरमे यांच्या उपस्थितीत दाखल अर्जाची छाननी प्रकीया पार पाडली, यावेळी लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निरिक्षक शिल्पा करमरकर, माजी खासदार प्रा रविंद्र गायकवाड, आमदार प्रवीण स्वामी आदिसह उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधींच्या उपस्थितीत छाननी प्रक्रिया पार पडली. छाननी प्रक्रियेत जिल्हा परिषद गटाच्या ९ जागेसाठी ९० अर्ज तर पंचायत समितीच्या १८ गणासाठी १६३ वैध ठरले. छाननीत वैध ठरलेले नामनिर्देशन पत्र उमेदवारांना मंगळवारी (दि २७) जानेवारी दुपारी तीन वाजेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.

त्यानंतर निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी दिली. तुरोरी गटातील आक्षेप फेटाळले!

छाननी प्रक्रिये दरम्यान तुरोरी जिप गटातील भाजपा अधिकृत उमेदवार प्रियंका प्रकाश आष्टे यांच्या अर्जावर अपक्ष उमेदवार पुजा विकास जाधव यांनी आक्षेप नोंदवला होता. तर अपेक्षा आष्टे यांनी भाजपा कडून उमेदवारी नाकारण्यात आलेल्या अपक्ष अर्चना जाधव यांचे जात प्रमाणपत्र कर्नाटक राज्यातील असल्याचा आक्षेप घेतला होता, रात्री उशिरापर्यंत याबाबत खलबते सुरू होते. मात्र हे दोन्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आक्षेप फेटाळून लावला.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

## नळदुर्ग पोलीस ठाण्यात नराधमावर गुन्हा दारवल; जीवे मारण्याची दिली होती धमकी

धाराशिव, पुढारी वृत्तसेवा लग्नाचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार मार्च २०२५ पासून ते १८ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू होता. नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील तरुणाने पीडितेला लग्नाचे आश्वासन दिले होते. याच आमिषापोटी त्याने वेळोवेळी तरुणीला शेतात नेऊन तिच्यावर अमानुष लैंगिक अत्याचार केला.

पीडितेने या कृत्याचा विरोध केला असता, आरोपीने या घटनेबाबत कोणालाही सांगितल्यास तिला तसेच तिच्या कुटुंबीयांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती.

आरोपीच्या जाचाला कंटाळून अखेर पीडितेने २१ जानेवारी रोजी नळदुर्ग पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी याप्रकरणी गांभीर्याने दखल घेत आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पीडित तरुणी आणि आरोपीची ओळख उघड होऊ नये, याकरिता पोलिसांनी त्यांची नावे गोपनीय ठेवली आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649